विद्यार्थ्याचे नाव :- वैष्णवी सिद्धेश्वर लेंगरे

इयत्ता :- नववी (गट अ)

पत्ता :- c/o श्री. यु.व्ही. कोठरे, प्लॉट नं. 22, चंद्रमा रेसीडेन्सी,
फत्तेपूरकर कॉलनी, केबीपी कॉलेजच्या पाठीमागे,
पंढरपूर, जि. सोलापूर
पिन-कोड : 413304

ई-मेल : ranilengare85@gmail.com

मो. नं. :- 7775805503 / 9689852317

शाळा :- द.ह. कवठेकर प्रशाला, पंढरपूर, वीर सावरकर पथ,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

## निबंध स्वलिखित प्रमाणपत्र

मी कु. वैष्णवी सिद्धेश्वर लेंगरे इयत्ता नववी, द.ह. कवठेकर प्रशाला, पंढरपूर असे प्रमाणपत्र लिहून देते की, 'भारतीय संविधानाचे महत्त्व' हा निबंध मी स्वहस्ताक्षरात लिहून सदर स्पर्धेसाठी पाठवत आहे.

निबंध स्पर्धेसाठी स्वहस्ताक्षरातील प्रमाणपत्र दिले असे.

कु. वैष्णवी लेंगरे

Lengare.V.S

# भारतीय संविधानाचे महत्व

"ये शान है ये मान है, वतन का ये सम्मान है।
चले वतन इसी से ही, यही मेरा अभिमान है।
ये मेरा संविधान है, ये मेरा संविधान है।।"

भारताचे संविधान म्हणजे केवळ त्यातील शब्द नव्हेत, तर या देशातील व्यक्ती केंद्रस्थानी मानून स्वातंत्र्य आणि समतेची आस धरणारा एक जिवंत दस्तावेज आहे. संविधानाची पायाभूत मूल्ये न्यायपालिकेने जपलीच पण ती लोकांमध्ये, नागरी समाजातही रुजायला हवीत. दिल्लीत 1946 सालच्या डिसेंबरात संविधान सभेची स्थापना झाली आणि राज्यघटनेला किंवा संविधानाला आकार देण्याचे काम प्रत्यक्षात सुरु झाले. संविधानाला लेखी सनदेचे रुप मिळण्यापूर्वीपासून आणि त्याची वाटचाल सुरु होण्याच्या आधीपासून 'संविधान संस्कृती' आपल्या देशात होती.

भारतीय संविधान हे सत्तांतरातून नागरिकांना आपले भवितव्य घडवू देणारे पाऊल ठरले. 'राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि मुक्तीभाव यांना मूर्तरुप देतानाच 'सामाजिक क्रांती' घडवण्याची साधने लोकांहाती सोपवणारी एक जिवंत रचना म्हणजे आपले संविधान!' अशा अर्थाचे वर्णन संविधानाला 'राष्ट्राची कोनशिला' ठरवणाऱ्या ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनीही केले आहे.

संविधान सभेने दोन वर्षे अकरा महिने व अठरा दिवस या दीर्घ कालावधीत संविधान पूर्ण केले. आपलं संविधान हिंदी आणि इंग्रजी भाषेत हाताने लिहीले गेलं. भारतीय राज्यघटना हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय तसेच प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या मूल्यांची राज्यघटनेत बीजे रोवून भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यात आली. सध्या भारताच्या राज्यघटनेत 1 प्रास्ताविका, 12 अनुसूची, 25 भाग, 448 कलमे, 5 परिशिष्टे आहेत.

"दुर्जनों भाषा, सैकडो विधी, हजारो विधान है।
जो जोडकर सबको साथ रखे, वो संविधान है।।"

संविधानकर्त्यांपुढे वैविध्यपूर्ण समाज आणि त्यातील ताणतणाव होते. अशा वेळी तयार झालेले आपले संविधान

अनेक बदल पचवून आजही 28 राज्यांतील 21 भाषा आणि असंख्य बोली बोलणाऱ्या 1.2 अब्ज लोकांवर अधिराज्य करते आहे. जगातील जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या धर्माचे अनुयायी भारतात आहेत. हे भाषिक, धार्मिक वैविध्य पचवणाऱ्या संविधानात वरवर पाहता ज्यांना 'अंतर्विरोध' मानता येईल, अशा अनेक बाबी दिसतील पण त्यामुळेच हे संविधान भारतीय समाजाला सांधणारे ठरले आहे. भारतीय समाज हा मूलतः धार्मिक असूनदेखील ते 'सेक्युलर' आहे. संविधानात 'सेक्युलर स्टेट' किंवा 'धर्मनिरपेक्ष राज्य' या शब्दाचा थेट समावेश 1976 साली झाला असला तरी संविधान सभेने आपल्या देशाचे धर्मनिरपेक्ष स्वरुप मान्य केले होते.

नाना पालखीवालांच्या शब्दांत सांगायचे तर, 'आपले संविधान ही स्वातंत्र्याने सत्तेला दिलेली सनद आहे. हे स्वातंत्र्य लोकांना दान म्हणून मिळालेले नसून, स्वतंत्र प्रजासत्ताकाचे नागरिक म्हणून स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या लोकांनीच उलट कायदेमंडळ आणि प्रशासन यांना सत्ता प्रदान केली आहे.' भारतीय संविधानाच्या वाटचालीच्या इतिहासाने अनेक महत्त्वाच्या घटना दुरुस्त्या पाहिल्या.

"शहीदों के लहू की स्याही से,
ये संविधान बना है।
हर दिन संभाल के रखो,
मेरा देश महान बना है॥"

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये सर्व भारतीय नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य व समता या तीन मूल्यांची व त्यानुसार व्यवहार करण्याची कायदे करुन ती मूल्ये प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याची हमी दिली आहे. अन्याय दूर करुन सर्वांना आपल्या प्रगतीची संधी मिळवून देणे म्हणजे कल्याण होईल या दृष्टीने उपाय योजना करणे म्हणजे न्याय प्रस्थापित करणे होय. त्यातील सामाजिक न्याय म्हणजे व्यक्तिंमध्ये जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश, जन्मस्थान अथवा लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव न करणे होय. प्रत्येकाला आपले व कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी उपजीविकेचे साधन मिळवण्याचा हक्क आहे, त्यालाच आर्थिक न्याय म्हणतात. राजकीय न्यायानुसार वयाची अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व

नागरिकांना मत देण्याचा अधिकार आहे. संविधानातील दुसरे महत्त्वाचे मूल्य म्हणजे स्वातंत्र्य. स्वातंत्र्य म्हणजे आपल्यावर जाचक, अयोग्य निर्बंध नसणे. आपल्यातील क्षमतांचा विकास करण्यास पोषक वातावरण तयार करणे. स्वातंत्र्य असेल तरच लोकशाही प्रगल्भ होते. विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हे व्यक्तींचे मूलभूत स्वातंत्र्य आहे. आपल्या धर्माच्या किंवा आपल्या पसंतीच्या धर्माच्या शिकवणुकीनुसार वागण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक भारतीय नागरिकाला आहे.

संविधानातील तिसरे महत्त्वाचे मूल्य म्हणजे समता. उद्देशिकेने भारतीय नागरिकांना दर्जा आणि संधी याबाबतीत समतेची हमी दिली आहे. जात-धर्म, वंश, लिंग इत्यादींवर भेदभाव न करता माणूस म्हणून सर्वांचा दर्जा सारखा असेल असा याचा अर्थ आहे. उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेद न करता उद्देशिकेने 'संधीची समानता महत्त्वाची मानली आहे.

अशा प्रकारे संविधान हे सांस्कृतिक, धार्मिक अल्पसंख्यांकांना 'परके' न मानता देशातील बहुविध बहुविधता मान्य करणारा दस्तावेज आहे. वरवर पाहता देशात एकवाक्यता नसेल तर लोकशाही कशी टिकणार अशी चिंता व्यक्त केली जाते पण आपल्या देशातील सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक वैविध्य हे लोकशाही सबल करण्यासाठी सहभागी घटक ठरले आहेत. जेव्हा प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा आदर करुन तिच्या स्वातंत्र्याचा व हक्काचा सन्मान करेल, तेव्हा आपोआपच व्यक्तिप्रतिष्ठा निर्माण होईल. संविधानिक मूल्ये भारतीय संविधानाची उद्दिष्टे स्पष्ट करतात. आपण सर्व भारताचे नागरिक आहोत. आपणा सर्वांना एक देश म्हणून काय मिळवायचे आहे, हे संविधान सांगते. यातील मूल्यांचे आपण पालन केले पाहिजे म्हणून शेवटी एवढेच सांगू इच्छिते की,

"न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता
दिली ही महान तत्वे संविधानाने,
जात, धर्म, प्रांत भाषा विसरुन
जगूया आपण फक्त माणुसकीने."